CNR No. MHRG120000382015

नियमीत दिवाणी दावा क्र. ५/२०१५
मुश्तरी वि. जैनबी व इतर

## निशाणी क्र.७० कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी क्र.७/१ यांच्यासमोर मयत अशी नोंद घेण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र.७/१ यांचा मृत्यू दिनांक २८/०२/२०२३ रोजी झाला असून त्यांचे कायदेशीर वारस प्रतिवादी क्र.७/२ ते ७/४ अभिलेखावर सामील आहेत. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल योग्य तो आदेश पारीत करण्याची मागणी केली आहे. वादी आणि प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.७/१ मयत झाल्यामुळे त्यांच्या नावासमोर मयत अशी नोंद घेणे आवश्यक आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत प्रतिवादी क्र.७/१ यांच्या नावासमोर मयत अशी दुरुस्ती करुन वादपत्राची दुरुस्ती प्रत दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : १९/१०/२०२३

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड